आस्थापना शाखा

5/9/3/12

**परिपत्रक क्रमांक** ३५६ **दिनांक** ३०/८/१२

विषय :- न्यायिक कामात सुसुत्रता व बदल अर्ज दाखल करुन घेण्यापूर्वी अवलंबावयाच्या पध्दतीबाबत.

31 AUG 2012

धर्मादाय संघटनेतील सर्व विभागीय कार्यालयामध्ये असे निदर्शनास आले की, मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये कलम २२ व २२ अ अंतर्गत फेरफार अर्ज दाखल होतात. दाखल करुन घेतेवेळी आवश्यक असणारे दस्तऐवजा अभावी फेरफार अर्ज बराच काळ प्रलंबित राहतात.

त्यामुळे संबंधीत प्रकरणे दाखल करण्याच्या पध्दतीमध्ये एकसुत्रता आणणेकामी अधिक्षक (न्याय)/संबंधित अधिक्षक यांनी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० अन्वये बदल अर्ज दाखल करतेवेळी खालीलप्रमाणे बदल अर्जासोबत दस्तऐवज आहेत किंवा नाही याची पहाणी करुनच बदल आवक लिपिकाकडे स्विकारण्यास पाठवावे.

**१. विश्वस्त/ कार्यकारी मंडळातील बदल.**

१. कलम २२ अन्वये अर्ज शेडयुल III च्या नमुन्यामध्ये विश्वस्त बदल/कार्यकारी मंडळ बदल.
२. फेरफार अर्जास १०० रु. कोर्ट फी स्टॅम्प.
३. सभेच्या ठरावाची प्रमाणित प्रत.
४. नविन विश्वस्त/कार्यकारी मंडळाचे संमतीपत्र.
५. जुन्या विश्वस्त/कार्यकारी मंडळाचे ना हरकत पत्र.
६. सर्वसाधारण सभेच्या नोटीसची प्रमाणित प्रत. नोटीस बजावणी केल्याचा पुरावा.
७. सभासदांच्या यादीची प्रमाणित प्रत.
८. विश्वस्त/कार्यकारी मंडळाच्या सभेच्या उपस्थितीबाबत (Attendance) प्रमाणित प्रत.
९. विश्वस्त/कार्यकारी मंडळातील सभासदाचा मृत्यु झाला असल्यास, मृत्यु प्रमाणपत्र.
१०. सार्वजनिक न्यास नोंदवही (शेडयुल १) ची प्रमाणित प्रत
११. असल्यास न्यासाच्या मागिल मंजूर झालेल्या बदल अर्जाची प्रमाणित प्रत.
१२. न्यासाच्या नियम व नियमावलीची/न्यास पत्र/घटनेची प्रमाणित प्रत.
१३. प्रतिज्ञा पत्रासह विलंब माफीचा अर्ज (जर फेरफार अर्ज ९० दिवसांच्या आत दाखल केला नसल्यास)
१४. फेरफार अर्ज हा विश्वस्तांसंबंधी असेल तर त्याचे ओळखपत्र व सध्याचा रहिवासी असल्याबाबतचा (पत्ता) पुरावा.

**२. स्थावर मालमत्तेसंबंधी बदल अर्ज.**

१. अर्जासोबत स्थावर मालमत्तेच्या नोंदणीकृत दस्ताऐवजाची प्रमाणित प्रत.
२. भाडे करार
३. ७/१२
४. नमुना ८-अ
५. इमारतीचा विमा काढल्याचा पुरावा.
६. मूल्यांकन अहवाल (Valuation Report) त्याच्या प्रमाणित प्रती.

**३. जंगम मालमत्तेसंबंधी बदल अर्ज.**
शासकीय रोखे, ठेवी, गहाणपत्रे, शेअर्स प्रमाणपत्र, दागिण्यांचा व्हॅल्यूएशन रिपोर्ट, गाडी खरेदीबाबत कागदपत्रे, विमा काढल्याचा पुरावा इत्यादीची कागदपत्र सादर करणे.

**४. एफ सेक्शनखाली नोंद केलेल्या न्यासाच्या नावात व उद्देशात बदल याबाबतचा बदल अर्ज.**
१. किरकोळ अर्ज (संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये).
२. फेरफार अर्ज (शेडयुल III) १०० रु. कोर्ट फी स्टॅम्प.
३. सर्वसाधारण सभेच्या ठरावाची प्रमाणित प्रत.
४. सर्व सभासदांना सभेची नोटीस दिल्याबाबतच्या पुराव्याची प्रमाणित प्रत.
५. सभासद हजेरीपत्रकाची व इतिवृत्ताची प्रमाणित प्रत.
६. एक महिन्याच्या अंतराने विशेष सर्वसाधारण सभेच्या ठरावाची प्रमाणित प्रत.
७. विशेष सर्वसाधारण सभेची नोटीस सर्व सभासदांना दिल्याबाबतच्या पुराव्याची प्रमाणित प्रत.
८. सभासद नोंदवहीची प्रमाणित प्रत.
९. जुने ज्ञापन, नियमावलीची प्रमाणित प्रत.
१०. सुधारीत ज्ञापन, नियमावली यात प्रत्येक पानावर नविन कार्यकारीणीतील अध्यक्ष, सचिव, खजिनदार यांच्या सहया आवश्यक.
११. तुलनात्मक तक्ता :- नियम क्रमांक, जुना नियम, नविन नियम, शेरा मध्ये बदलाचे कारण नमुद करावे असे चार रकाने असावेत.

वरील यादीनुसार दस्तऐवज आहे किंवा नाहीत हे पडताळून संस्था नोंदणी अर्ज, ट्रस्ट नोंदणी अर्ज व बदल अर्ज दाखल करुन घ्यावेत. तसेच वेबसाईटवर, कार्यालयीन नोटीस बोर्डवर प्रसिध्द करण्यात यावे.

जेव्हा बदल अर्जासोबत आवश्यक ते दस्तऐवज दाखल केलेले नाहीत, तेव्हा अधीक्षक (न्याय)/ संबंधित अधिक्षक यांनी खालील पध्दतीचा अवलंब करावा :-
१. आलेल्या बदल अर्जास तात्पुरता क्रमांक देवून त्याची नोंद कच्चा रजिस्टरमध्ये घ्यावी.
२. बदल अर्ज दाखल करण्यास आलेल्या प्राधिकृत व्यक्तीकडे आवश्यक असलेल्या दस्तऐवजाची यादी देवून समज घ्यावी.
३. बदल अर्जाच्या मागील बाजूस अशा प्रकारची समज मिळाल्याबाबत व ३० दिवसांच्या आत दस्तऐवज दाखल करण्याबाबतची हमी प्राधिकृत व्यक्तीकडून घ्यावी.

जर ३० दिवसांचे आत सदरचे दस्तऐवज प्राप्त झाल्यास, अधीक्षक (न्याय)/ संबंधित अधिक्षक यांनी सदरचे दस्तऐवज संबंधीत बदल अर्जास लावून, त्यास कायमस्वरुपी नंबर देवून, संबंधित अधिका-याकडे पुढील कार्यवाहीसाठी पाठवावा.

यदा कदाचित ३० दिवसांचे आत दस्तऐवज सादर न केल्यास, अधीक्षक (न्याय)/ यांनी सदरचे प्रकरण संबंधित अधिका-यासमोर ठेवावे. संबंधित अधिका-यांनी मा. धर्मादाय आयुक्त यांच्या दिनांक २४/११/१९७१ रोजीच्या सर्क्युलर क्रमांक १४६ प्रमाणे दाखल केलेल्या बदल अर्जाची चौकशी करावी.

धर्मादाय आयुक्त,
महाराष्ट्र राज्य, मुंबई

प्रति,
सर्व धसआ/सधआ
CO/HO/M-20/E;/MY DOC/SSC/30/8/12